**आर्थिक वर्ष २०२३-२४ महानिर्मितीच्या भुसावळ १x६६० मे.वॅ. प्रकल्पासाठी भागभांडवल रोखीने वितरीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**ऊद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,**
**शासन निर्णय, क्र.निधिवि-२०२३/प्र.क.७५(भुसावळ)/ऊर्जा-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक -: ०१ सप्टेंबर, २०२३

<u>संदर्भ</u> :-१. शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.प्रकल्प-२०१०/प्र.क्र.३/उर्जा-४,दि.०५/१०/२०१०.
२. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/ अर्थ-३, दि. १२/०४/२०२३.
३. महानिर्मिती कंपनीचे पत्र क्र.CMD/MSPGCL/No. 8617, दि. १०/०८/२०२३.

<u>प्रस्तावना</u> :-

भुसावळ औष्णिक विद्युत प्रकल्पास संदर्भिय शासन निर्णय क्र. १ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने भुसावळ औष्णिक बदली प्रकल्पाच्या रु. ४२९०.०० कोटी पैकी शासनाचे २०% भागभांडवल रु.८५८.०० कोटी इतके मंजूर केले आहे. त्यापैकी आजतागायत रु. ७५२.२४ कोटी भागभांडवल महानिर्मिती कंपनीस वितरीत करण्यात आले आहे.

२. महानिर्मिती कंपनीने सदर प्रकल्पासाठी रु.१०५.७६ कोटी इतक्या निधीची मागणी केलेली आहे. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात मागणी क्रमांक के-११, ४८०१४०८६ या लेखाशिर्षाअंतर्गत सन २०२३-२४ करिता रू. ५३८.०० अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. वित्त विभागाने पहिल्या सदर लेखाशिर्षाखाली तीन महिन्याकरिता बी.डी.एस. प्रणालीवर २०% निधी वितरणासाठी उपलब्ध केला आहे. त्यानुसार महानिर्मिती कंपनीने मागणी केलेली रक्कम २०% च्या मर्यादेत असल्याने रू. १०५.७६ कोटी निधीपैकी रु.५१,९६,२३,०१८/- (रु.एक्कावन्न कोटी शहाण्णव लाख तेवीस हजार अठरा रुपये फक्त) महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीस भाग भांडवल स्वरुपात रोखीने वितरित करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय** :-

भुसावळ औष्णिक विद्युत प्रकल्पामध्ये राज्य शासनाची भांडवली गुंतवणुक म्हणून रु.५१,९६,२३,०१८/- (रु.एक्कावन्न कोटी शहाण्णव लाख तेवीस हजार अठरा रुपये फक्त) इतका निधी महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीस भाग भांडवल स्वरुपात रोखीने वितरित करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली भागभांडवलाची रक्कम ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आलेली आहे, त्याच कारणासाठी उपयोगात आणली जाईल याची खातरजमा करावी.

३. वरील बाबीचा खर्च "मागणी क्र.के-११ मुख्यलेखाशिर्ष ४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च ०२ ओष्णिक विद्युत निर्मिती,१९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका,पंचवार्षिक योजना, राज्य योजना (००) (०३) भुसावळ ओष्णिक विद्युत प्रकल्पाच्या बदली प्रकल्पामध्ये भांडवली गुंतवणूक (४८०१४०८६) ५४, गुंतवणूक" या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२४ या वित्तीय वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदीमधुन खर्ची टाकण्यात यावा.

४. सदर रक्कम अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांचेकडून आहरित करुन, ती रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी यांना अदा करण्यासाठी “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून डॉ.गौरी पाटील, कार्यासन अधिकारी (उर्जा-३) आणि “नियंत्रण अधिकारी” म्हणून श्री. नारायण श्री. कराड, उप सचिव (उर्जा-३) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यांनी सदर मंजूर झालेली रु.५१,९६,२३,०१८/- (रु.एक्कावन्न कोटी शहाण्णव लाख तेवीस हजार अठरा रुपये फक्त) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई येथून आहरित करुन महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी यांचे नावे स्वतंत्ररीत्या आरटीजीएस/एनइएफटी द्वारे वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

५. शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२३/ प्र.क्र.४०/ अर्थ-३, दि.१२/०४/२०२२ च्या परिपत्रकातील सोबतच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ९ मधील अटीची पूर्तता होत आहे. तसेच अनुक्रमांक १ ते ८ मधील अटीं लागू होत नसल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

६. या लेखाशिर्षाखाली निधी वितरित करण्यासाठी सादर करण्यात आलेल्या देयकाच्या अनुषंगाने प्रमाणित करण्यात येते की, या लेखाशिर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही तसेच उपयोगिता प्रमाणपत्र प्रलंबित नाही. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२२/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.१२/०४/२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२३०९०११५३२११९३१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NARAYAN SHRIKRISHNA KARAD

Digitally signed by NARAYAN SHRIKRISHNA KARAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT, 2.5.4.20=fc35aa8ffade5bb6105200693c60a32b755f7e67f72965b8dd57adaa570981f1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AE7FAEABAF4571C2748E4DD5FFD2CD108DE0E130859970F4D7D0EE40046B3E9E, cn=NARAYAN SHRIKRISHNA KARAD
Date: 2023.09.01 15:46:13 +05'30'

**( ना. श्री. कराड )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत:-**

१. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा. उपमुख्यमंत्री (ऊर्जा) ,यांचे सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) ,यांचे सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
५. सर्व मा. मंत्री, यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा. विरोधीपक्ष नेता ( विधानसभा व विधानपरिषद) मुंबई-३२यांचे खाजगी सचिव.
७. मा. मुख्य सचिव, मंत्रालय,मुंबई-३२.
८. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई.
९. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई.

१०. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित, हाँगकाँग बँक बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.
११. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे, (पूर्व), मुंबई-५१
१२. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
१३. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
१५. अधिदान व लेखा अधिकारी, अराप / रालेवि-१), मुंबई.
१६. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
१७. निवासी लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.
१८. वित्त विभाग, (अर्थसंकल्प-१४ / साधनसंपत्ती / साऊ / व्यय-१६) मंत्रालय, मुंबई-३२..१-
१९. कक्ष अधिकारी (रोख), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२०. निवडनस्ती (ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.